सन २०१९-२० मध्ये राज्यातील आदिवासी जिल्ह्यामध्ये आदिवासी कुटुंबाच्या परसबागेत फळझाडे व भाजीपाला लागवडीची योजना राबविण्यास व रु.१४.४० लाख (रु.चौदा लाख चाळीस हजार फक्त) वितरणास मान्यता देणेबाबत.
(लेखाशिर्ष- २४०१ A८०६).

महाराष्ट्र शासन
कृषि,पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
शासन निर्णय क्र.आपयो-२०१९/प्र.क्र.१२१/९अे
हुतात्मा राजगुरू चौक,मादाम कामा रोड,
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२.
दिनांक- २३ ऑगस्ट, २०१९.

वाचा:-

१. कृषी व पदुम विभाग, शासन निर्णय, क्र. आपयो-२०१८/प्र.क्र.१७३/९-अे, दि. ०१/१०/२०१८.
२. वित्त विभाग, शासन परिपत्रक, क्र. अर्थसं-२०१९/प्र.क्र. ४४/अर्थ-३,दि.०१/०४/२०१९.
३. संचालक फलोत्पादन, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. कृआ / फलो-३/आदिवासी परसबाग/१९-२०/५८६/१९, दि. २०/०५/२०१९.
४. वित्त विभाग, शासन परिपत्रक, क्र. अर्थसं -२०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३, दि.०८/०७/२०१९.
५. आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय, क्र. बीयुडी-२०१९/प्र.क्र.०७/कार्यासन-६ दि.२३/०७/२०१९

प्रस्तावना :-

आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत राज्यातील १४ जिल्हयांतील आदिवासी भागातील कुपोषणाचे प्रमाण कमी करण्याच्या उद्देशाने व आदिवासी बांधवांना पौष्टिक आहार पुरविण्यासाठी, आदिवासी कुटुंबाच्या परसबागेत पौष्टीक भाजीपाला व फळांची निवड करुन त्याची लागवड करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी **"आदिवासी कुटुंबाच्या परसबागेत फळझाड व भाजीपाला लागवड"** ही योजना राज्यात सन २००३-०४ पासून राबविण्यात येत आहे. सदर योजना राबविण्याकरीता सन २०१९-२० या आर्थिक वर्षात रु.२४.०० लाख इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आलेला आहे. त्यास अनुसरुन सदर योजना सन २०१९-२० मध्ये राज्यात राबविण्याकरीता रू.२४.०० लाख निधीचा प्रस्ताव संचालक (फलोत्पादन) यांनी शासनास सादर केला आहे. सन २०१९-२० च्या प्रथम नऊमाही करीता (डिसेंबर-२०१९ अखेर) आवश्यक असणारा अनिवार्य व कार्यक्रमावरील खर्चाचा अर्थसंकल्पित निधी एकूण वार्षिक तरतूदीच्या ६०% च्या मर्यादेत वितरण व संनियंत्रण प्रणालीव्दारे (बिम्स) वितरीत केला जाईल असे आदेश उपरोक्त वाचा येथील क्र.४ च्या शासन परिपत्रका अन्वये, देण्यात आले आहेत. उपरोक्त वाचा येथील क्र. ५ च्या शासन निर्णयान्वये आदिवासी विकास विभागाने लेखाशीर्ष (२४०१ A८०६) या लेखाशीर्षाखाली ६०% च्या

मर्यादेत रू.१४.४० लाख फक्त (रू. चौदा लाख चाळीस हजार फक्त) इतका निधी विभागाच्या अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर वितरित केला आहे.

सदर योजना सन २०१९-२० मध्ये राज्यात राबविण्यास रु. २४.०० लाख इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आलेला आहे. सदर रू.२४.०० लाखाच्या कार्यक्रमास प्रशासकीय मान्यता व वित्त विभागाच्या आदेशानुसार अर्थसंकल्पीत निधीच्या ६०% च्या मर्यादेत म्हणजे रू.१४.४० लाखाच्या कार्यक्रमास वित्तीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती, त्यास अनुसरून शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

<u>शासन निर्णय :-</u>

१. राज्यातील ठाणे, पालघर, पुणे, नाशिक, धुळे, नंदूरबार, जळगांव, अहमदनगर, नांदेड, यवतमाळ, गडचिरोली, चंद्रपूर, अमरावती व गोंदिया या १४ जिल्हयातील आदिवासी कुटुंबाच्या परसबागेत फळझाड व भाजीपाला लागवडीची योजना सन २०१९-२० मध्ये राबविण्याच्या कार्यक्रमास व सदर योजनेकरीता आवश्यक असलेल्या रु.२४.०० लाख इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. तसेच योजनेची अंमलबजावणी करण्यास वित्त विभागाच्या परिपत्रकानुसार अर्थसंकल्पित निधीच्या ६०% च्या मर्यादेत रुपये १४.४० लाख (रुपये चौदा लाख चाळीस हजार फक्त) इतकी रक्कम खर्च करण्यास वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

२. या योजनेसाठी होणारा खर्च रुपये १४.४० लाख (रुपये चौदा लाख चाळीस हजार फक्त) सन २०१९-२० या वर्षाकरीता मंजूर व अर्थसंकल्पित केलेल्या तरतुदीनुसार पुढील लेखाशिर्षातून भागविण्यात यावा.

"मागणी क्र.टी -५,
२४०१- पीक संवर्धन,
(७९६),जनजाती क्षेत्र उपयोजना
(०१) (३२) आदिवासी जिल्हयात परसबाग योजना
(२४०१ A८०६)
३३ अर्थसहाय्य."

३. आदिवासी कुटुंबामध्ये कुपोषणाचा प्रश्न मोठ्या प्रमाणावर असल्याने विशेष बाब म्हणून उपलब्ध करून दिलेल्या तरतूदींतून झालेल्या खर्चाचा अहवाल, लेखाशिर्षनिहाय/उपलेखाशीर्षनिहाय तसेच साध्य झालेले भौतिक उद्दिष्टनिहाय माहिती, निधी उपयोगिता प्रमाणपत्र, संबंधित क्षेत्रिय अधिकारी यांनी आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक, संबंधित अपर आयुक्त, आदिवासी विकास, आदिवासी विकास विभाग व कृषि व पदुम विभाग यांना प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत पाठवावी.

४. नियंत्रण अधिकारी व विभाग प्रमुख यांनी आदिवासी उपयोजना क्षेत्रात, अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रात तसेच आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील क्षेत्रात विविध योजनांवर केलेला खर्च स्वतंत्रपणे नोंदविला जाईल याची दक्षता घ्यावी. जेणेकरून शासनाला आदिवासी उपयोजना क्षेत्रातील व आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील योजनांवर होणाऱ्या खर्चावर लक्ष ठेवता येईल.

५. आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत सदरहू योजना ही वैयक्तिक लाभाची योजना असल्याने TSP व आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील क्षेत्रात फक्त वैयक्तिक लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्यात यावा व त्या करीता तरतूद खर्च करावी.

६. सदर प्रकरणी इतर कार्यवाही उपरोक्त वाचा येथील क्र.१ मध्ये नमूद केलेल्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार करावी.

७. हे आदेश शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि.०१/०४/२०१९ व क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३,दि.०८/०७/२०१९ मधील अटींची पुर्तता करण्याच्या अधिन राहून प्रशासकीय विभागास प्रदान केलेल्या अधिकारात निर्गमित करण्यात येत आहेत.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०८२३१५३९३५१३०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by Ashok Maroti Atram
Date: 2019.08.23 15:52:36 +05'30'

(अशोक आत्राम)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.मंत्री, (फलोत्पादन) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई-३२.
२. मा.राज्यमंत्री (कृषी व फलोत्पादन), यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई-३२.
३. मा. सचिव (कृषी) यांचे स्वीय सहाय्यक,कृषि व पदुम विभाग, मंत्रालय , मुंबई.
४. आयुक्त(कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य , पुणे.
५. आयुक्त (आदिवासी विकास), महाराष्ट्र राज्य, नाशिक.
६. अपर आयुक्त, आदिवासी विकास नाशिक/नागपूर/ठाणे/अमरावती.
७. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ,पुणे.
८. संचालक (फलोत्पादन),कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य , पुणे.
९. सर्व विभागीय कृषि सहसंचालक, महाराष्ट्र राज्य.
१०. सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.
११. सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, महाराष्ट्र राज्य.
१२. महालेखापाल-१-२(लेखा व अनुज्ञेयता) (लेखा व परिक्षा), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.
१३. अधिदान लेखाधिकारी, मुंबई.
१४. सहायक संचालक (लेखा),आयुक्त (कृषि), यांचे कार्यालय, पुणे.
१५. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय ग्रंथालय, विधानभवन, मुंबई.
१६. माहिती व जनसंपर्क संचालनालय,मंत्रालय, मुंबई-३२ (प्रसिध्दीसाठी).
१७. कार्यासन क्र.२ व ९ आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१८. कार्यासन ९-अे, निवडनस्ती.